## सप्तपदी

नारंगी रंगाची आभा घेऊन
दंवातल्या पाण्याने न्हाऊन
सोनेरी किरणांच्या हळदीत माखून
निसर्ग हिरव्या शालू कांकणातली
उष:प्रभा दिनमणी पुजित राहिली
गोरज मुहुर्ताच्या समयाला
ल्स्ज्जेने लालसर तीच मावळत
निळ्या सावळ्याचा हात धरून
तारांगणाची सप्तपदी करत
युगानुयुगे ती जातच राहीली

**जयश्री माने**